महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ ०७ जून २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३३९ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पत्रकार हवे आहेत**

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

# रायगडावर शिवराज्याभिषेकाचा सोहळा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** रायगडावर शिवराज्याभिषेक दिन मोठ्या जल्लोषात साजरा(रायगडावर शिवप्रेमींची प्रचंड गर्दी)पेण(प्रतिनिधी) युगप्रवर्तक हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक सोहळा दुर्गराज किल्ले रायगडावर आज मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. छत्रपती संभाजी राजे आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शासकीय मानवंदना देण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयजयकाराने किल्ले रायगड दुमदुमले. शिवभक्तांमध्ये मोठं उत्साहाचं वातावरण व पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या शिवभक्तांनी लोककलांचे सादरीकरण आणि पोवाडे यामुळे रायगडावरील वातावरण शिवमय झालं असल्याचं पाहायला मिळाले.किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा विविध कार्यक्रमांनी संपन्न झाला. याप्रसंगी विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण विभाग संजय दराडे,जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे यासह विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. मोठ्या उत्साहात झालेल्या सोहळा कार्यक्रमासाठी या ठिकाणी कडक बंदोबस्तासह सुरक्षेचीही काळजी घेण्यात आली. अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती मार्फत विविध कार्यक्रम आयोजित केले होते. या सोहळ्यानिमित्त विविध शासकीय विभाग व जिल्हा प्रशासनाने अन्नछत्र, पिण्याचे पाणी, आरोग्य, स्वच्छता, सावलीसाठी मंडप, मोफत बससेवा आदी सुविधा मोठ्या प्रमाणात पुरविण्यात आल्या होत्या.हा सोहळा पाहण्यासाठी महाराष्ट्रातूनच नाही तर देशभरातून शिवभक्त या ठिकाणी महाराजांना वंदन करण्यासाठी आले होते.

**छत्रपती संभाजी राजे आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शासकीय मानवंदना देण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयजयकाराने किल्ले रायगड दुमदुमले. शिवभक्तांमध्ये मोठं उत्साहाचं वातावरण व पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या शिवभक्तांनी लोककलांचे सादरीकरण आणि पोवाडे यामुळे रायगडावरील वातावरण शिवमय झाल्याचे पाहायला मिळाले.**




## भाजपा तर्फे शहापूरात वृक्षारोपण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी शहापूर तालुका वतीने पूर्व मंडळामध्ये वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. जागतिक पर्यावरण दिन सर्वत्र साजरा होत असताना, भाजप तालुका वतीने आयोजित पूर्व मंडळामध्ये भाजपचे ठाणे जिल्हाध्यक्ष ग्रामीण जितेंद्र डाकी, शहापूर विधानसभा निवडणुक प्रमुख अशोक इरणक यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमावेळी भाजप पूर्व मंडळ प्रमुख कार्यकर्ते तुकाराम भाकरे, मुकुंद शिर्के, प्रकाश दिनकर, बाळा वाळिंबे, हरिभाऊ डोंगरे, हरेश निश्चिते, विठ्ठल भांगरे, पुंडलिक दिनकर, अनंता विशे, कृष्णकांत वाळींबे, अनंता निमसे, प्रितेश हजारे, दत्ता ढमके, तुकाराम शिर्के, नितीन वेखंडे, भगवान वाघ, जयवंत ठाकरे, बाळू शिंदे , निलेश वाळींबे, अभिजीत भोईर, जयवंत गायकर, दत्ता दिनकर, पंकज चौधरी, विष्णू लखांबरे, अमोल सापळे, सचिन जाधव, अरुण म्हसकर, अक्षय इरनक, गणेश विशे, शांताराम धाणके, जयवंत ढमके, अशोक गगे, किशोर बांगर, नितीन ठाकरे, भरत यशवंतराव, पांडुरंग बांगर, तुषार विशे, रमेश दिनकर, सुभाष गगे, कैलास विशे, महेश पवार, कल्पेश शिर्के, योगेश पवार, गणेश भरे , प्रगती चौधरी, राजेश विशे, लहू गायकर, प्रकाश पडवळ, किरण पडवळ आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी एआय तंत्रज्ञान वरदान- अनिल बोरनारे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** प्रतिनिधीबदलत्या काळाचा विचार करता तंत्रज्ञानाशिवाय शिक्षण घेणे अशक्य असून आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच एआय शिक्षक व विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी वरदान ठरत असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय शिक्षण संस्था डोंबिवली संचलित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर येथे शिक्षकांसाठी एआय कार्यशाळेत केले.

या कार्यशाळेचा शुभारंभ अनिल बोरनारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय कुलकर्णी, कार्यवाह शिरीष फडके, सहकार्यवाह प्रमोद उंटवाले, खजिनदार संजय दीक्षित, मुख्याध्यापिका वैभवी सावंत, मुख्याध्यापक सुरेश नारोळे शिक्षण क्रांती संघटनेचे कल्याण डोंबिवली अध्यक्ष गजानन पाटील, तज्ज्ञ मार्गदर्शक जयेश पाटील व संस्थेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. एआय मुळे इतर क्षेत्रात कर्मचाऱ्यांवर परिणाम होऊ शकतो तसा शिक्षणक्षेत्रात होणार नसल्याचे सांगून कोणत्याही शिक्षकांची नोकरी जाणार नसल्याचे बोरनारे यांनी सांगितले.

एआय च्या विविध टूल्सच्या माध्यमातून शिक्षक आपले अध्यापन प्रभावी करू शकतात राज्यात अनेक शिक्षकांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून शाळांचा कसा कायापालट केला याची अनेक उदाहरणे उपस्थित प्रशिक्षणार्थी शिक्षकांना दिली. नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी राज्यात जून पासून सुरु होणाऱ्या नविन शैक्षणिक वर्षांपासून सुरु होत असून त्यासाठी शिक्षकांनी सज्ज राहायला सांगून नविन शैक्षणिक धोरणात देशाला विश्वगुरु बनविण्याची क्षमता असून शिक्षकांवर मोठी जबाबदारी आली असल्याचेही बोरनारे यांनी सागितले

## आणीबाणी लादलेला दिवस म्हणजेच ब्लॅक डे – रविंद्र चव्हाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण :** ठाणे : देशातील आणीबाणीच्या घटनेला ५० वर्षे पुर्ण झाली असून त्यावेळी काँग्रेस पक्षाने संविधानाचा अपमान केला. दिड लाखांपेक्षा जास्त समाजसेवकांना तुरुंगात टाकण्याचे काम काँग्रेसने केले. त्यामुळे या कडू घटनेची आठवण करून देणे आणि हा दिवस काळा दिवस म्हणून पाळणे गरजेचे आहे, असे मत भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले. तसेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येकवेळी देशाला वेगळया उंचीवर घेऊन जाण्याचे काम करीत असल्याचे ही त्यांनी सांगितले.

ठाणे येथील वर्तकनगर भागातील भाजपच्या विभागीय कार्यालयात शुक्रवारी 'संकल्प से सिद्धी तक' हि कार्यशाळा पार पडली. पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण, मंत्री गणेश नाईक आणि नितेश राणे यांच्या उपस्थित पार पडलेल्या कार्यशाळेत ठाण्यासह कोकणपट्ट्यातील आजी-माजी जिल्हाध्यक्ष, मंडळ अध्यक्ष, आजी-माजी आमदार आणि खासदार हे उपस्थित होते. या बैठकीनंतर कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

## बदलापुरात रायगडावरील शिव स्मारकाची प्रतिकृती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून बदलापुरातील गांधीनगर येथे रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाची प्रतिकृती साकारली जात आहे. यानिमित्ताने हजारो वर्षे टिकणाऱ्या कातळाच्या दगडातून हे स्मारक उभे राहत आहे. या स्मारकाचा जीर्णोद्धार आणि शिवराज्याभिषेकाचा ऐतिहासिक सोहळा बदलापूरकरांना अनुभवता येणार आहे. महाराजांचे हे स्मारक ऐतिहासिक वास्तूंच्या धर्तीवर उभारले जाणार आहे. रायगडावरील छत्रपती शिवरायांच्या स्मारकाची प्रतिकृती या ठिकाणी साकारण्यात येणार आहे. यामध्ये कातळ दगडांचा वापर केला असून या दगडावरील बांधकामांवर असलेले नक्षीकाम, कोरीव काम साधारण दीड वर्ष कारखान्यात चालले. शिवाय, काही कोरीव काम या १० कारागिरांच्या माध्यमातून स्मारकाच्या ठिकाणी केले जात आहे. स्मारकात ५०हून अधिक गड-किल्ल्यांची माती, ५१ तीर्थक्षेत्रांचे जल अर्पण करून उभारले जात आहे. ६ जूनला शिवराज्याभिषेकदिनी छत्रपती शिवरायांची सिंहासनावर आरुढ झालेल्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. वेद ब्राह्मणांच्या साक्षीने महाराजांचा शिवराज्याभिषेक सोहळाही या निमित्ताने पार पडणार आहे. पारंपरिक वाद्यांच्या गजरात, शिवकालीन वेशभूषा धारण करत शिवरायांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक, टाळ-मृदंग, लेझीम, ढोल ताशांच्या निनादात हा सोहळा पार पडणार आहे. शिवस्मृती क्रीडा मंडळ गांधीनगर रहिवासी संघ आणि आई एकवीरा मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हे स्मारक साकारले जात आहे.

## ठाणे मनपाच्या घनकचरा शुल्कात वाढ !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** महापालिकेच्या घनकचरा विभागाकडून दिल्या जाणाऱ्या खासगी सेवांच्या शुल्कात वाढ करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाकडून घेण्यात आला आहे. खासगी मालमत्तेमधील सेफ्टीक टँकची स्वच्छता, कचरा आणि रॅबिट उचलणे तसेच रस्त्यावरील मेलेली जनावरे उचलणे यासाठी नागरिकांना यापुढे अधिकचे शुल्क भरावे लागणार आहे. पुढच्या तीन वर्षासाठी हे अधिकचे शुल्क निश्चित करण्यात आले असल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी कचरा उचलणे आणि स्वच्छतेची जबाबदारी ठाणे महापालिकेची असली तरी, स्वच्छतेसंदर्भात खासगी सेवा देण्यासाठी शहरातील गृहसंकुले, आस्थापना आणि इतर खासगी मालमत्तेत सेवा देण्यासाठी महापालिकेकडून विशेष सेवा दर आकारले जातात. आता याच सेवा दरांमध्ये वाढ करण्याचा निर्णय ठाणे महापालिकेच्या घनकचरा विभागाकडून घेण्यात आला आहे. ठाणे शहरात मोठ्या प्रमाणात गृहसंकुलांची निर्मिती होत असून प्रशासनाला या सेवा देताना अधिकचा ताण सहन करावा लागणार आहे.

**आमदार किसन कथोरेंच्या पाठपुराव्याला यश**

## अंबरनाथ, कल्याण , मुरबाडमध्ये क्रीडा संकुलांसाठी भरीव निधीची तरतूद



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** अंबरनाथ, कल्याण व मुरबाड येथील तीनही तालुका मध्ये क्रीडा संकुलाच्या उभारणी तसेच डागडुजी संदर्भात १५ दिवसांत कार्यवाही करण्याचे निर्देश क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत दिले. यावेळी मुरबाड विधानसभा क्षेत्राचे आमदार किसन कथोरे, सदाशिव खोत, सुहास कांदे, प्रभारी आयुक्त सुधीर मोरे, उपसचिव सुनिल पांढरे, उपसंचालक सुहास पाटील, माणिक पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर, मुरबाड चे तहसिलदार अभिजित देशमुख, अमित पुरी, मुरबाड सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता संजय कोरडे, मदन हिरवे यांच्यासह जिल्हा क्रीडा अधिकारी, तालुका क्रीडा अधिकारी उपस्थित होते.









## गीतासार



**अध्याय १३**
**क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगः**

असक्तिर नभिष्वङ्गः पुत्रदारगृहादिषु । नित्यं च समचित्त त्वमिष्टा निष्टोपपत्तिषु ॥ १३-९ ॥

पुत्र, स्त्री, घर आणि धन इत्यादींची आसक्ती नसणे व ममता नसणे तसेच आवडती आणि नावडती गोष्ट घडली असता नेहमीच चित्त समतोल ठेवणे ॥ १३-९ ॥

मयि चानन्ययोगेन भक्तिरव्य भिचारिणी । विविक्तदेश सेवित्वमर तिर्जनसंसदि ॥ १३-१० ॥

मज परमेश्वरामध्ये अनन्य योगाने अव्यभिचारिणी भक्ती, तसेच एकान्तात शुद्ध ठिकाणी राहण्याचा स्वभाव आणि विषयासक्त मनुष्यांच्या सहवासाची आवड नसणे ॥ १३-१० ॥

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् । एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥ १३-११ ॥

अध्यात्मज्ञानात नित्य स्थिती आणि तत्त्वज्ञानाचा अर्थ जो परमात्मा त्यालाच पाहणे, हे सर्व ज्ञान होय, आणि याउलट जे असेल, ते अज्ञान होय, असे म्हटले आहे. ॥ १३-११ ॥

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञा त्वामृतमश्नुते । अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥ १३-१२ ॥

जे जाणण्याजोगे आहे आणि जे जाणल्यामुळे मनुष्याला परम आनंद मिळतो, ते चांगल्या प्रकारे सांगतो. ते अनादी परम ब्रह्म सत् ही म्हणता येत नाही आणि असत् ही म्हणता येत नाही ॥ १३-१२ ॥

# सिंगापूर कोळेवाडी अंगणवाडी भरती स्थानिकांना डावलले!

## सरपंचांची मुख्याधिकाऱ्यांना लेखी तक्रार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(दिलीप पवार) : मुरबाड तालुक्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजना मुरबाड 2 प्रकल्प अंतर्गत ग्रामपंचायत सिंगापूर कार्यक्षेत्रातील कोळेवाडी या स्थानिक महसूल गावातील अंगणवाडी सेविकेच्या रिक्त जागेसाठी पद भरतीची प्रक्रिया राबविण्यात आली होती या भरतीमध्ये ग्रामपंचायत सिंगापूर या महसूल गावातील स्थानिक आदिवासी महिला उमेदवारांना डावलेले असल्याची लेखी तक्रार सिंगापूर ग्रामपंचायतीचे सरपंच देवराम वाघ यांनी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्याकडे केली आहे

मुरबाड तालुक्यातील अंगणवाडी भरतीत प्रक्रियेत एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प मुरबाड - 2 टोकावडे पेसा कार्यक्षेत्रात असलेल्या सिंगापूर कोळेवाडी येथील स्थानिक महसूल गावातील अंगणवाडी भरतीत प्रक्रियेत एकुण 15 महिलांनी अर्ज केले असताना स्थानिक 14 आदिवासी उमेदवारांना डावलुन सिंगापूर ग्रामपंचायत हद्दीत नसलेल्या ग्रामपंचायत पळु येथील महिलेला बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी प्राधान्य दिले आहे

याबाबत सिंगापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच तसेच प्रतिभा वाघ यांनी लेखी अपील एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प टोकावडे मुरबाड 2 यांच्याकडे अपील केली होती परंतु सदर आपिलावर सुनावणी न लावता प्रभारी बाल विकास प्रकल्प अधिकारी अपर्णा विशे यांनी स्थानिक महसूल गावातील उमेदवारांना गुणांकनामध्ये डावलले आहे. तसेच ग्रामपंचायत पळू येथील उमेदवारास पात्र केले असल्याची तक्रार ग्रामपंचायत सिंगापूर सरपंच देवराम वाघ यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे. सदर पद भरती ही पारदर्शक व्हावी स्थानिक महसूल गावातील रहिवासी उमेदवाराची निवड व्हावी. तसेच पळू ग्रामपंचायत मधील उमेदवार अपात्र ठरवावा असे लेखी निवेदनामध्ये नमूद केले आहे.

> **अंगणवाडी सेविका पद भरती मध्ये बालविकास प्रकल्प अधिकारी मुराबाड २ (टोकावडे) यांनी ग्रा. पं. सिंगापूर (कोळेवाडी) येथील स्थानिक महसूल गावातील उमेदवाराला डावलले आहे. आम्हाला न्याय मिळाला नाही तर आम्ही उपोषणाचा मार्ग अवलंबणार आहोत.- देवराम वाघ, सरपंच, ग्रामपंचायत सिंगापूर.**

**स्थानिक महसूल गावाचा नियम धाब्यावर :** कोळेवाडी हे ग्रा. पं. सिंगापूर या महसूल गावामध्ये समाविष्ट असून या अंगणवाडी सेविका पद भरती मध्ये स्थानिक महसूल गावातील उमेदवार असावा अशी शासकीय परिपत्रकामध्ये अट असताना सदर अंगणवाडी भरतीमध्ये स्थानिक नसलेल्या ग्रामपंचायत पळू मधील रहिवाशी उमेदवाराला बाल विकास सेवा प्रकल्प अधिकारी अपर्णा (विशे) भोईर यांनी चुकीच्या पद्धतीने प्राधान्य दिले आहे. असे सिंगापूर ग्रामपंचायत चे सरपंच देवराम वाघ, उपसरपंच, सदस्य, यांनी निवेदनात म्हटले आहे.

> **या भरतीप्रक्रियेत माझी काहीच चूक नाही. ग्रामसेवक यांच्या महसुली गाव माहितीनुसार आम्ही भरती केली आहे. यामध्ये ग्रामसेवक यांची चूक आहे. - अपर्णा (विशे) भोईर, प्रकल्प अधिकारी, मुरबाड-२**

> **या प्रकरणात माझा काहीही दोष नाही. जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर लगेचच मी महसूल गावांची संपूर्ण माहीत दिलेले आहे. त्याच्या पोहोच माझ्याकडे आहेत. त्यामुळे मी दोषी असूच शकत नाही. - प्रकाश कोळी, ग्रामसेवक, सिंगापूर,**

> **याबाबत मीसुद्धा मुख्यकार्यकारी अधिकारी ठाणे यांना एका मीटिंग मध्ये सूचित केले होते की, महिला व बाल विकास प्रकल्प कार्यालयाचा कारभार अत्यंत भोंगळ आहे. तुम्ही यामध्ये लक्ष घालावे. - योगिता शिर्के, सामाजिक कार्यकर्त्या तथा माहिती अधिकार कार्यकर्ती**

# तानसा किनारी स्वच्छता मोहिम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



वासिंद : वनशक्ती संस्था, वनविभाग अंबाडी, कुणबी समाज संस्था ठाणे/पालघर जिल्हा, सुखभूमी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने व कृषी विभाग संजय घरत यांच्या सहकार्याने तर वनशक्ती संस्थेचे प्रकल्प अधिकारी निशांत पाटील, योगिता कासार यांच्या पुढाकाराने व नियोजनाने आयोजित जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून डाकिवली फाटा तानसा नदीकाठी व परिसरात भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेत प्लास्टिक पिशव्या, थर्माकोल, फाटके कपडे, काच, बाटल्या यांसारख्या पर्यावरणावर घातक परिणाम करणाऱ्या वस्तू मोठ्या प्रमाणावर संकलित करुन सुमारे 400 किलोहून अधिक कचरा उचलण्यात आला. तर या उपक्रमात चांबळे गावांमधील शाळेतील 25 पेक्षा जास्त विद्यार्थी व 40 पेक्षा अधिक स्वयंसेवक व ग्रामस्थांनी या मोहिमेत सहभाग घेतला होता. तर यामध्ये नदीकाठचा कचरा उचलणे व नागरिकांना जनजागृतीपर संदेश देण्यात आले असल्याचे जयेश शेलार यांनी म्हटले.



## मुरबाड नगरपंचायतची भर पावसात नालेसफाई

### १५० टन गाळ रस्त्यावर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड नगरपंचायत हद्दीमध्ये मान्सून पूर्व तयारीच्या अनुषंगाने शहरातील मुख्य नाले व अंतर्गत नाले यांची साफसफाईचे कामे सुरू करण्यात आली. मुरबाड शहरात एकूण १७ प्रभाग मधील सर्व मुख्य नाल्यांची सफाई करून जेसीबीच्या सहाय्याने गटारील १५० टन गाळ काढण्यात आला. मुरबाड शरातील सर्व प्रभागातील गटारांची सफाई आरोग्य विभागातील कर्मचाऱ्याकडून करण्यात अली आहे. येणाऱ्या पावसाळ्यात मुरबाड शहरात नाले तुंबून पाणी भरले जाणार नाही याची दक्षता मुरबाड नगरपंचायत मुख्याधिकारी मनोज म्हसे यांकडून घेण्यात आली आहे.

# महावितरणचे पथनाट्यातून ग्राहक सुरक्षिततेचे धडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : विद्युत अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी 'आम्ही सुरक्षेचे शिल्पकार शून्य अपघाताने करू महावितरणचे ध्येय साकार' या ब्रिद वाक्याद्वारे 'शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन महावितरणच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने दि. १ ते ६ जून २०२५ या कालावधीत राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सुरक्षाविषयक ई-मेल व एसएमएस पाठविणे, भित्तीपत्रके, चित्रफिती अशा विविध माध्यमांद्वारे विद्युत सुरक्षेविषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती विद्युत सुरक्षा सप्ताहादरम्यान मॅरेथॉन, रॅली, निबंध,चित्रकला व पथनाट्य स्पर्धेचे माध्यमातून देण्यात आली.

ठाणे शहरातील लोकमान्य नगर वस्ती ही दाटीवाटीची असल्यामुळे त्या जागी मागील दोन वर्षात दोन विद्युत अपघात होऊन एक 11 वर्षाचा मुलगा व 45 वर्षाचे गृहस्थ विद्युत अपघाताने मरण पावले आहेत. यापुढे असे अपघात होऊ नये म्हणून स्थानिक माजी नगरसेवक दिलीप बारटक्के यांनी कार्यक्रमासाठी नियोजन करून विद्युत सुरक्षा विषयी जनजागृती कार्यक्रम हाती घेतला व महावितरणचे वर्तक नगर शाखा क्रमांक 1, सहायक अभियंता समिर रमेश संखे, लोकमान्य नगर उपविभाग सहाय्यक अभियंता यामिनी बोरोले, गुणवत्ता तथा नियंत्रण व त्यांचे तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी, अधिकारी व कर्मचारी वर्ग यांनी नाना नानी पार्क, सावरकर नगर येथे विद्युत सुरक्षा संबंधी माहिती ग्राहकापर्यंत पोहोचवली. पथनाट्यातून ग्राहकांना आपली सुरक्षा कशा पद्धतीने करता येईल याची प्रात्यक्षिक दाखवली. तसेच आरसीसीबीचे महत्व पटवून दिले.

# त्र्यंबकेश्वर येथे मद्यपींचा उच्छाद

## महिला भाविकांना धक्काबुक्की



### शहापूरच्या भाविक कुटुंबाची गाडी फोडली

**भाविकां मध्ये संतापाची लाट**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : नाशिक त्र्यंबकेश्वर येथून देव दर्शन घेऊन येत असतांना पेंगळवाडी फाट्याजवळ साईबाबा मंदिरासमोर मुख्य रस्त्याला शहापुरातील एका भाविक कुटुंबाला तेथील स्थानिक टपोरी गावगुंडांकडून मारहाण झाली असून यामध्ये वयोवृद्ध महिला प्रमिला गोतरणे (वय 58) व ( मनाली रामदास गोतरणे (वय 19 ) यांना धक्काबुक्की करून मोबाईल हिसकावून जमिनीवर फेकले तर वयोवृद्ध असलेले रामदास गोतरणे यांच्या कानशिलात लगावत त्यांना जमिनीवर पाडून लाथा घातल्या. या घृणास्पद प्रकारामुळे भाविकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

गुंड प्रवृत्तीच्या तरुणांनी शहापुरातील भाविक कुटुंबाला नाहक मारहाण करत त्यांची इर्टिका चारचाकी गाडी सुद्धा फोडून टाकली.या घटनेचे मोबाईलमध्ये चित्रिकरण केले असून हा प्रकार पोलीसांसमोर सुरु असताना त्यांनी बघ्याची भूमिका घेतल्याचा आरोप प्रत्यक्षदर्शी असलेल्या भाविकांनी केला.दरम्यान त्याच दिवशी त्याच हद्दीत सरकारी एस.टी.बसमध्ये येथील तरुण घुसून काही भाविक प्रवासी यांना मारहाण करत काही प्रवाशांना लुटल्याचा प्रकार झाल्याचे रविंद्र गोतरणे यांनी सांगितले.या परिसरात अशी लूटमार, गुंडगिरी हे नेहमीचेच असल्याचे स्थानिक नागरिक तथा काही भाविकांकडून बोलले जात आहे.दरम्यान या दिवसेंदिवस वाढत चालल्याने येथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.यामुळे भाविकांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे. यासंदर्भात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच नाशिक पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे रविंद्र गोतरणे यांनी सांगितले.

# कातकरी समाजासाठी समृद्धीच्या वाटा उपक्रम

## उपजिल्हाधिकारी बाळासाहेब खांडेकर प्रमुख उपस्थिती!



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : विविध नावीन्यपूर्ण उपक्रम शीलतेतून सतत चर्चेत असलेल्या गुलाबी कातकरी वाडी शेलारी यांच्या वतीने कातकरी भगिनींचे प्रबोधन व्हावे म्हणून समृद्धीच्या वाटा या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार ८ जून २०२५ रोजी शांताराम बाबू बांगर यांच्या शांताई निसर्ग पर्यटन केंद्र शेलारी म्हाडस येथे सदर कार्यक्रम होत असून बाळासाहेब खांडेकर उपजिल्हाधिकारी ,मुंबई यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. तर भावना राजभोर शिक्षणाधिकारी (योजना) जि.प.ठाणे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

गेली सहा वर्ष सातत्याने आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, रोजगार, व्यसनमुक्ती, चंदन परिषद या माध्यमातून गुलाबी कातकरी वाडीने विशेष प्रगती केली आहे. याचाच आदर्श कातकरी समाजाने घ्यावा म्हणून या उपक्रमाचे आयोजन केले आहे अशी माहिती संयोजक योगेंद्र बांगर यांनी दिली.

सान्वी सोशल वेल्फेअर ऑर्गनायझर्स अध्यक्षा ईशा रावत या ,५००आदिवासी महिलांसोबत शिक्षण संवाद साधणार आहेत तसेच १५० गरजू विद्यार्थ्यांना दप्तरे व शिक्षण किट देणार आहेत. टीम परिवर्तन,आंघोळीची गोळी संस्थेचे अविनाश पाटील, सर्पमित्र सुहास पवार, मधमाशी पालक तरे ,उद्योजक साबण, अगरबतीचे प्रशिक्षक चेतन पोतदार, मोहलाडू साठी प्रसिद्ध स्ववनच्या रूपाली अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तानाजी घागस, उमेश चौधरी,रानभाज्या अलका वाघ,निसर्ग रांगोळी महेश रूमाले,बांबूकाम संताजी घोरपडे, कास्टमूर्तीकार संतोष घावट,पक्षीमित्र प्रविण विशे,चंदन मार्गदर्शक अमोल रोंगे लातूर, निसर्ग उपचार रेखा नाईक वसई, बाराखडीचे शैलेश पाटील,शिक्षक भालचंद्र गोडांबे, स्पर्शचे प्रतीक लाड, योगेश तेलवणे, वैद्य मनोज जगझाप असे मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. उपस्थित नोंदणीकृत ५००कातकरी भगिनींना पावसाळ्यासाठी रेनकोट वाटप करण्यात येणार आहेत. प्रवेश निःशुल्क असून नोंदणी साठी 9326058383 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.







## आजचे राशिभविष्य



**मेष**
योग्य परिश्रमातून बऱ्यापैकी समाधान आणि आनंदाचा लाभ घेता येईल. आपल्या अधिकाराचा दुरुपयोग टाळा. धंद्यात काम मिळेल.

**वृषभ**
अनेक प्रांतांमध्ये आपला प्रभाव राहील. महत्त्वाची कामे आणि प्रकरणांना चालना देता येईल. स्पर्धा आणि साहसी कृत्ये टाळा.

**मिथुन**
कामकाजात तडफदारी दिसून येईल. सामाजिक कार्यात प्रतिष्ठा मिळेल. प्रवासात घाई करू नका. आवडत्या क्षेत्रात प्रगती होईल.

**कर्क**
नोकरीत अनुकूलता लाभेल. नवे निर्णय घेता येतील. विरोधकांना पुढे सरकू देऊ नका. कौटुंबिक वातावरण चांगले राहील.

**सिंह**
बौद्धिक युक्तीचा वापर करून बऱ्यापैकी प्रगती साधता येईल. मन उत्साहित होईल. समस्या सोडवण्याचा मार्ग शोधता येईल.

**कन्या**
वादाचे प्रसंग टाळा. व्यवहारात सावधानता बाळगा. आपल्या योजना आणि संकल्पांना उत्तेजन मिळेल. आरोग्याची काळजी घ्या.

**तूळ**
एखाद्या समस्येवर उपाय शोधता येईल. आनंदी राहाल. सावधपणे काम करा. आपली प्रतिष्ठा शाबूत ठेवता येईल. स्पर्धेत जिंकाल.

**वृश्चिक**
सध्या मोठ्या योजनांचा विचार करणे योग्य नाही. आपली स्थगित प्रकरणे पुढे सरकवता येतील. नव्या कार्याला दिशा मिळेल.

**धनु**
नव्या क्षेत्रात प्रवेश करणे आपणास शक्य होणार आहे. घरातील वातावरण प्रसन्न राहील. प्रवासाचे योग येतील. नवीन ओळख होईल.

**मकर**
कालचक्र अधिक वेगवान ठेवता येईल. संयमाने आपला कार्यभाग साधावा लागणार आहे. आपल्या विचारांना चालना मिळेल.

**कुंभ**
मोठी खरेदी करताना घाई करू नका. ठरवलेले काम पूर्ण करता येईल. कोणताही वाद वाढू देऊ नका. मान आणि प्रतिष्ठा मिळेल.

**मीन**
धंद्यात नव्या कामाचा शोध घ्याल. विरोधकांची धास्ती बाळगू नका. प्रवासाचा बेत ठरवाल. पदाधिकार मिळण्याची शक्यता आहे.

## रेसिपी

### डाळ इडली



**साहित्य :**
1 कप मुग डाळ
1/2 कप उडीद डाळ
2-3 सुक्या मिरच्या
2-3 लसुण पाकळया
जिरे ,मीठ

**कृती:**
रात्री दोन्ही डाळी धुवुन भिजत घालाव्यात. मिरच्या आणि लसुणही त्यातच भिजत घालावे.
दुसरे दिवशी हे सगळे मीठ व जिरे घालुन बारीक वाटुन घ्यावे.
नंतर इडलीपात्रातुन इडल्या वाफवुन घ्याव्या.
हे मिश्रण आंबवायची गरज नसते. त्यामुळे या इडल्या झटपट होतात.
यात आपण आवडीप्रमाणे भाज्या घालु शकतो. अश्या या सोप्या,पौष्टिक इडल्या.



# जैव विविधता वाढविणाऱ्या फुलझाडांची लागवड

## फुलझाडी लागवडीतून पशुपक्षी व किटकांना मिळणार निवारा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन धर्मवीर आनंद दिघे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था ठाणे(वागळे) हया ठिकाणी आयडीए (इंडियन डेंटल असोसिएशन ठाणे) आणि इश्रे (इंडियन सोसायटी फॉर हीटिंग रेफ्रिजरेशन एअर कंडिशनिंग इंजिन) यांच्या संयुक्त विद्यमाने पशू ,पक्षी, कीटक, मधमाशी याच्या माध्यमातून जैव विविधता वाढविणे, अधिवास निर्माण करणे, सुभोषितकरण करणेसाठी संस्थेचे प्राचार्य माने मॅडम ह्याच्या मार्गदर्शनाखाली दि.05 जून 2025 रोजी वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. यावेळी "आय डी ए " या संस्थेचे अध्यक्षा डॉ मनिषा लाड सह ठाणे जिल्ह्यातील २० दंत वैद्यकीय अधिकारी, "इशरे " ह्या संस्थेचे अध्यक्ष मनोज खाती, मनोहर पाटील, चारुचंद्र देवस्थळे, त्यावेळी बी टी आर आय चे सप्रस जी आर कर्पे, संस्थेमधील गटनिदेशक, निदेशक इतर कर्मचारी वृंद आणि एन स स प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

सर्व फुलझाडचे वृक्षारोपण हे श्रीमती अंजना देवस्थळे उद्यानविकास सल्लागार, ठाणे यांच्या मार्गदर्शनात आय टी आय चे दर्शनी भागावरच वेगवेगळया दहा ते पंधरा जातीचे फुलपाखरू, कीटक, मधमाशी, पक्षी ह्यांना आकर्षित करणारी फुलाची झाडे लावण्यात आली. त्यामध्ये शंकासुर, हळदकुंकू, मंदार, अक्जोडा ,जमैकन स्पाईल, कणेर, लांटेनं, सदाफुलि, गलफानिया सारख्या सुभाषित करणाऱ्या आणि जैव विविधता वाढविणाऱ्या फुलझाडचा समावेश आहे. तसेच ह्या फुल झाडांमुळे कीटक,पक्षी, मधमाश्या ह्यांना अन्न, निवारा ह्याची सोय होणार आहे.

संस्थेचे प्राचार्य यांनी संस्थेत एक सुंदर उपक्रम राबविल्याबद्दल दोन्ही संस्थांचे आभार मानले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लिंगरकर मॅडम, देशमुख सर, मगर सर आणि प्रशिक्षणार्थी ह्याचे मोलाचे सहकार्य लाभले.

# सरपंच साक्षी साठे यांचा सन्मान




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील) : आबिटघर ग्रामपंचायत सरपंच साक्षी संतोष साठे यांचा दैनिक नवभारत (नवराष्ट्र) या वृत्त समुहाच्या वतीने पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

सरपंच साक्षी साठे यांच्या मार्गदर्शनाखाली व पुढाकाराने कार्यरत ग्रामपंचायत विभाग व समितीच्या माध्यमातून विविध उपक्रमा बरोबरच केलेल्या लोकाभिमुक विकास कामे, लोकहिताचे धोरणात्मक निर्णय, सामाजिक, शैक्षणिक तसेच पायाभूत सुविधांचे योग्य नियोजन व अंमलबजावणी या केलेल्या कार्याची दखल घेऊन दैनिक नवभारत (नवराष्ट्र) या वृत्त समुह वतीने दरवर्षी कार्यकर्तृत्वाची छाप सोडणारी व्यक्तिमत्वे - संस्था यांना देण्यात येणाऱ्या पुरस्कारामध्ये आबिटघर लोकसरपंच साक्षी संतोष साठे यांना प्रदान करण्यात आला. बोईसर येथे पार पडलेल्या या सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक, खासदार हेमंत सवरा, आमदार राजेंद्र गावित, आमदार विलास तरे, जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, पालघर जिल्हा पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, नवभारत वृत्त समूहाचे मुख्य संपादक सुहास मलमे आदी मान्यवर उपस्थित होते.

# विघ्नहर्ता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कल्याण

नोंदणी क्र. : टि. एन. ए./के. एल. एन./आर. एस. आर./(सी. आर.)/११०८/ २०००-२००१ मोबा : ७०४५८५४८६४

कार्यालय : ए.पी.एम.सी. मार्केट, गाळा नं. J/A/१०८-१०९, फोर्टीज हॉस्पिटल गल्ली, शिळ रोड, कल्याण (प.)

संस्थेच्या खालील कर्जदाराने सोने तारण ठेवून कर्ज घेतलेले असुन त्याची परतफेडीची मुदत संपलेली असुन सदर कर्ज रक्कम भरणेबाबत अंतीम नोटीस देवूनही त्यांनी सदर कर्ज व व्याज रकमेचा भरणा केला नाही. या नोटीसीने सदर कर्जदारांना कळविण्यात येते की संचालक मंडळाच्या दि. ०५ जून २०२५ च्या सभेतील ठराव क्र.६ अन्वये सदर कर्जदाराने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दि. २१ जून २०२५ पर्यंत कर्ज रकमेचा भरणा करुन सोने परत न नेल्यास सदर सोने सोमवार दि.२३ जून २०२५ रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता संस्थेच्या कार्यालय जे/ए १०८.१०९ बिल्डींग एपीएमसी मार्केट यार्ड बैलबाजार कल्याण पश्चिम येथे जाहीर लिलावाने विकण्यात येईल.

सदर लिलावासाठी लागणारा खर्च कर्जदाराच्या खाती वर्ग करण्यात येईल. सोन्यांचा लिलाव झाल्यानंतर कोणतीही तक्रार अथवा वादाची दखल घेतली जाणार नाही.

| अ.क्र. | कर्ज क्र. | कर्जदाराचे नाव व पत्ता | व्याजासह कर्ज रक्कम |
|---|---|---|---|
| १. | १७४/६८ | उघडे अविनाश विनायक<br>पत्ता : गणराज कॉलनी चाळ नं.५/४<br>हाजीमलंग रोड, अमरदीप कॉलनी,चेतना स्कुल<br>पिसवली कल्याण ईस्ट. काटेमानीवली ठाणे | २१६५००/- |

सही /-
अध्यक्ष
विघ्नहर्ता नागरी सहकारी पतसंस्था म. कल्याण करीता

जा.क्र. : १२/२५
दिनांक : ०६/०६/२०२५

## ठाणे जिल्हा परिषद

# माध्यमिक शिक्षणाधिकारी पदी देवीदास महाजन

## शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व प्रशासकीय कामे वेळेवर पूर्ण करण्याचे आश्वासन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांची प्रशासकिय अधिकारी, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था छत्रपती संभाजीनगर येथे प्रशासकीय बदली झाल्याने ठाणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी या रिक्त झालेल्या पदावर बृहन्मुंबई दक्षिण विभागात कार्यरत असलेले शिक्षण निरीक्षक देवीदास महाजन यांची ठाणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी पदावर नियुक्ती झाल्यामुळे दि.5 जून 2025 रोजी शिक्षणाधिकारी देवीदास महाजन त्यांनी प्रत्यक्ष हजर राहून शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांचेकडून ठाणे शिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार स्विकारला आहे.

यावेळी अधिक्षक संजय राऊत, उपशिक्षणाधिकारी भाऊसाहेब मोहिते, उपशिक्षणाधिकारी संदिप पाटील, सहा. प्रशासन अधिकारी ए. पी.राठोड, विस्तार अधिकारी मधुकर घोरड, लिपिक प्रशांत कसबे, निलेश मुटके व सर्व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

शिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार स्विकारताच रोजचे कामे रोज करावे, प्रलंबित कामे तपासून पूर्ण करावे, शासकिय कामे, पवित्र प्रणाली व संबंधित कामास प्राधान्य द्यावे. उपशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी व लिपिक यांचेशी चर्चा करून ई ऑफिस प्रणाली, अतिरिक्त कर्मचारी, समायोजन, न्यायालयीन प्रकरणे, परीक्षा, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी समस्या, वेतन, शैक्षणिक व प्रशासकिय कामाचा आढावा घेतला. तसेच ई ऑफिस प्रणालीद्वारे कार्यालयीन कामकाज सुरू करणे बाबतचा मनोदय व्यक्त केला. सहा.प्रशासन अधिकारी ए. पी.राठोड यांनी प्रास्ताविक करून उपशिक्षणाधिकारी भाऊसाहेब मोहिते व उपशिक्षणाधिकारी संदिप पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

# पेण येथे बेवारस मृतदेह : पोलिसांकडून शोध सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण पोलिसांकडून घेण्यात येत आहे. पेण शहरातील इस्राईल आळी, अंतोरा रोड येथील प्राची परेश पाटील यांचे बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या पार्किंगमध्ये संबंधित व्यक्ती बेशुद्धावस्थेत सापडला. या वेळी पोलिसांनी या व्यक्तीला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय येथे नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. त्यामुळे या मयत व्यक्तीच्या नातेवाइकांचा शोध पेण पोलिसांकडून सुरू आहे. २ जून रोजी संध्याकाळच्या सुमारास बीट मार्शल यांना मिळालेल्या माहितीनुसार संबंधित ठिकाणी साधारणपणे उंची ५.५ फुट उंची, मध्यम बांधा, वर्ण सावळा, केस काळ-पांढरे, दाढी वाढलेली, चेहरा लांबट, डोळे काळे, अंगात पांढऱ्या रंगाचे टीशर्ट आणि हाप पॅन्ट असे वर्णन असणारा व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. त्याला पेण उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. दरम्यान, संबंधित व्यक्तीजवळ एक पावती मिळाली. त्याच्यावर अनिल प्रकाश पाटील, राहणार पेण असे लिहिलेले आढळून आले आहे. त्याला कावीळ आजार असल्याचे नमूद करण्यात आले. मयताचा अंत्यविधी झाला नसून त्याच्या नातेवाइकांचा शोध सुरू आहे.



# अॅड मंगेश नेने यांना कोकण रत्न पुरस्कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पेण (प्रतिनिधी) पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अॅड मंगेश नेने यांच्या शैक्षणिक सामाजिक व सेवाभावी कार्यामुळे महाराष्ट्र पत्रकार संघाच्या वतीने राष्ट्रीय स्थरावरील कोकणरत्न पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले.मंगेश नेने यांचे सामाजिक, शैक्षणिक, कला क्रीडा , संगीत , साहित्य , उद्योग व सेवाभावी क्षेत्रातील अतुलनीय कार्याबद्दल त्यांना गौरविण्यात आले आहे. महाराष्ट्र पत्रकार संघाचे राज्य अध्यक्ष विलासराव कोळेकर यांच्या हस्ते अॅड . मंगेश नेने यांना कोकण रत्न पुरस्काराने कोल्हापूर येथे सन्मानित करण्यात आलं या अगोदरही त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. आपल्यावडिलांनी आणि काकांनी चालवलेला वसा आज तेही पुढे चालवत आहेत समाजाशी कुठेतरी आपली बांधिलकी आहे समाजाला न्याय देण्यासाठी आपला सहभाग असावा तसेच यापुढेही आपण समाजकार्यासाठी पुढे असणार आहोत असं मंगेश नेने यांनी सांगितलं

## सुप्रसिद्ध निवेदक शशिकांत चव्हाण यांना मातृशोक



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
राजेश दळवी

पडघा दि.६ : सुप्रसिद्ध निवेदक शशिकांत चव्हाण यांच्या मातोश्री आनंदीबाई चव्हाण यांचे दीर्घ आजाराने निधन झाले आहे. आनंदीबाई या अत्यंत मितभाषी सर्वांशी प्रेमाने वागणाऱ्या तसेच आपल्या कुटुंबियांना शिक्षित सुसंस्कृत करणा-या "आई" असा त्यांचा परिचय आहे. त्यांच्या पश्चात पती, मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार असुन अन्नपूर्णा नगर कल्याण ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष नारायण चव्हाण यांच्या त्या अर्धांगिनी व जी. पी पारसीक सहकारी बंकेचे व्यवस्थापक अनिल चव्हाण, यांच्या त्या मातोश्री होत्या.

■ आदरांजली सभा ■

रविवार दिनांक ०८ /०६/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता बी. बी. पाटील इंग्लिश हायस्कूल व ज्युनियर कॉलेज सभागृह, कुरूंदगाव रोड, पडघा टोल नाका शेजारी, पडघा-नाशिक हायवे, ता. भिवंडी, जि. ठाणे. येथे होणार आहे.

## केडीएमसी व रोटरी क्लब तर्फे

# क्षयरुग्णांना पोषण आहार वाटप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

क्षयरुग्णांना उपचार कालावधीत पोषक आहार मिळाल्यास त्यांचा औषधोपचार व आहार यांमुळे आजार बरे होण्याचे प्रमाण वाढते. मा. प्रधानमंत्री यांनी २०२५ पर्यंत २०१५ च्या तुलनेत क्षयरोगाचा प्रादुर्भाव ८० टक्के कमी करणे व क्षयरोगाच्या मृत्युमध्ये २०१५ च्या तुलनेत ९० टक्के कमी करण्याचे ध्येय निश्चित केले आहे. हे ध्येय साध्य करण्यास औषधोपचारा सोबतच आहाराची महत्वाची भूमिका आहे.

प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान या उपक्रमाचा शुभारंभ दि.०९.०९.२०२२ रोजी मा. राष्ट्रपती, भारत सरकार यांच्या शुभहस्ते झाला आहे.

प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत क्षयरोगाचा उपचार घेणाऱ्या व समुदाय समर्थनासाठी संतमी दिलेल्या क्षय रुग्णांना आहार पुरवठा करावयाचा आहे. अशा पध्दतीने क्षयरुग्णांना मोफत आहार पुरवठा करणाऱ्या व्यक्तीस "निक्षय मित्र" असे संबोधण्यात येते. त्या अनुषंगाने उपचारा खालील क्षयरुग्णांना दत्तक घेण्याची संकल्पणा पुढे आली. समाजातील सामाजिक सेवाभावी संस्था, दानशुर व्यक्ती, उद्योग समुह यांनी पुढाकार घेऊन निक्षय मित्र बनावे असे देशाचे पंतप्रधान यांनी सन २०२२ मध्ये आवाहन केले होते. त्या आवाहानास प्रतीसाद म्हणुन आचार्य अत्रे रंगमंदीर या ठिकाणी दि. ०६/०६/२०२५ रोजी कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभाग आणी रोटरी कल्ब ठाणे डीस्ट्रीक्ट क्रमांक ३१४२ यांच्या संयुक्त विद्यमाने मा. प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त भारत अभियान अतंर्गत निक्षय मित्रा कडून क्षयरुग्णांना पोषण आहार वाटप. कार्यक्रम आयोजित करण्यात आला.




कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या विनंतीस मान देऊन रोटरी क्लब ठाणे डौस्ट्रीक्ट क्रमांक ३१४२ यांनी सहकार्य करुन महापालिका क्षेत्रातील उपचारा खालील १०० क्षयरुग्णांना पुढील ६ महिन्यासाठी दत्तक घेऊन निक्षय मित्र बनन्याचा बहुमान मिळवला. त्याचाच एक भाग म्हणुन आज या कार्यक्रमात क्षयरुग्णांना पोषण आहाराचे वितरण करण्यात आले व उपचाराचे महत्व सांगण्यात आले. समाजातील सामाजिक सेवा भावी संस्था, दानशुर व्यक्ती यांनी पुढाकार घेऊन निक्षय मित्र बनावे असे मा. श्री हर्षल गायकवाड (अतिरीक्त आयुक्त, कडोंमपा) यांनी आवाहन केले व आणखी नव्याने निक्षय मित्र तयार करण्याचा मानस व्यक्त केला.

सदर कार्यक्रमास कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त मा. श्री. हर्षल गायकवाड, डीस्ट्रीक्ट गर्व्हनर रोटरी क्लब मा. श्री. दिनेश मेहता अवेन्यू चेअर, श्री. सचीन भोळे रोटरी क्लब, श्री. जगदिश चेलारमानी, डॉ. सोनल बांगडे, श्रीमती. किर्ती वडलकर, श्रीमती. अर्चना करमटकर, श्री. ललीत नेमाडे तसेच शहर क्षयरोग अधिकारी मा. डॉ. पौर्णिमा ढाके व डॉ. सुहासिनी बडेकर, डॉ. प्रज्ञा टिके, डॉ. संदीप पगारे, डॉ. गणेश डोईफोडे, श्री. मंगेश खंदारे आणि राष्ट्रीय क्षयरोग निर्मुलन कार्यक्रमा अंतर्गत कार्यरत सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# स्वच्छ आणि सुंदर ठाण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे – आमदार संजय केळकर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे (०६) : ठाणे शहर हे स्वच्छ, सुंदर आहे. या शहराचे विद्रुपीकरण होऊ नये म्हणून ठाणे महानगरपालिका प्रयत्न करतेच आहे. परंतु, ही संपूर्ण जबाबदारी ठाणे महापालिकेवर न टाकता नागरिकांनीही ठाणे स्वच्छ आणि सुंदर राखण्यासाठी महापालिकेला सहकार्य करावे, असे प्रतिपादन आमदार संजय केळकर यांनी ठाणे महापालिका आयोजित शून्य कचरा आणि पर्यावरण भव्य प्रदर्शनाला भेट दिल्यावर केले.

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने, ठाणे महापालिकेतर्फे नौपाडा येथील गावदेवी मैदानात 'उत्सव वसुंधरेचा, संकल्प हरित ठाण्याचा' या उपक्रमात शून्य कचरा व पर्यावरण या विषयावर आधारित प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरूवारी सायंकाळी या प्रदर्शनास, आमदार संजय केळकर, महापालिका आयुक्त सौरभ राव,




माजी नगरसेवक संजय वाघुले यांनी भेट दिली. त्याप्रसंगी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त शंकर पाटोळे, उपायुक्त मधुकर बोडके, परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी झालेल्या कार्यक्रमात आमदार संजय केळकर, महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्यासह सर्व मान्यवर आणि नागरिकांनी 'माझी वसुंधरा शपथ' घेतली. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेले हे प्रदर्शन हा स्तुत्य उपक्रम असून त्यास जास्तीत जास्त नागरिकांना भेट द्यावी, असेही आमदार संजय केळकर म्हणाले. याप्रसंगी, महापालिकेसाठी प्रत्येक दिवस पर्यावरण दिन असतो. पर्यावरणाचे क्षेत्र जितके उत्तम तितके ते शहर उत्तम असते. पर्यावरणपूरक विविध प्रकल्प ठाणे महापालिका राबवित असून या उपक्रमात नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. हा सहभाग वाढावा आणि नागरिकांना पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती मिळावी यासाठी या 'उत्सव वसुंधरेचा, संकल्प हरित ठाण्याचा' अंतर्गत या प्रदर्शनाचे आयोजन केले असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले.

उष्णता कृती आराखडा राबविणारी ठाणे ही देशातील पहिली महानगरपालिका असल्याचेही आयुक्त राव यांनी सांगितले. तसेच, हवेची गुणवत्ता चांगली कशी राखली यासाठीही महापालिकेने कृती आराखडा तयार केला आहे. महापालिका हद्दीत प्रतिदिन १४०० टन कचरा गोळा केला जातो. यासाठी डायघर येथे बायोगॅस प्रकल्प प्रतिदिन ३५० टन या क्षमतेने कार्यान्वित करण्यात आला आहे. तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी महापालिका मूर्तीकारांना शाडूची माती व जागा उपलब्ध करून देत असून 'माझे घर माझा बाप्पा' हे अभियान महापालिका राबविणार आहे. त्यात नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही आयुक्त राव यांनी केले.



# कातकरी वस्तीतील मुलांना पर्यावरण संगोपन मार्गदर्शन !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
शहापूर ग्रामीण :: नरेंद्र पाटील

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत पिंपळास गावातील पर्यावरण प्रेमी विजय चौधरी यांनी पुढाकार घेत येथील कातकरी वस्तीमधील मुलां समवेत वृक्षारोपण करुन संगोपनाचा निर्णय घेत पर्यावरण विषयी मार्गदर्शन व महत्त्व पटवून दिले. सध्या अवैध वृक्षतोड यामुळे जंगलांचे अस्तित्व संकटात आले आहे. झाडांचे महत्त्व माहित नसल्याने भरमसाठ होणारी वृक्षतोड हे थांबवण्यासाठी पुढील पिढीला वृक्षांचे महत्व व पर्यावरणाचे रक्षण याबाबत माहिती व्हावी यासाठी पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यामधील पिंपळास या गावातील पर्यावरण प्रेमी विजय चौधरी यांनी पुढाकार घेऊन येथील असलेल्या कातकरी वस्तीमधील जवळपास 15 मुलां समवेत 25 रोपांचं वृक्षारोपण करण्यात आले. सदर, लागवड केलेल्या वृक्ष रोपांच संगोपन करण्याचा निर्णय व पर्यावरण रक्षणाचा संकल्प करण्यात आले. तर या विषयी माहिती व जनजागृती व्हावी यासाठी विजय चौधरी यांनी मुलांना पर्यावरण विषयी मार्गदर्शन करुन पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून दिले.



# भाजपचे जेष्ठ नेते प्रमोद मांडलिक यांचे निधन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण शहरातील भारतीय जनता पार्टीचे माजी सरचिटणीस प्रमोद मोरेश्वर उर्फ बाळासाहेब मंडलिक यांचे अल्पशा आजाराने पुणे येथे दुखःद निधन झाले. मृत्यू समयी ते ७६ वर्षांचे होते. अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे संस्थापक अध्यक्ष,बिंदू माधव जोशी याचे प्रमोद मंडलिक हे सहकारी होते. पेण येथील दिनदयाळ पतसंस्थेचे संचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ स्वयंसेवक व विविध सामाजिक संस्थामध्ये ते कार्यरत होते. प्रमोद मंडलिक यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. सामाजिक चळवळीमध्ये ते नेहमी सहभागी होत असत. त्यांच्या निधनाने विश्व हिंदू परिषद बजरंग दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाजपा आदी कार्यकर्त्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

# 'छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर अभियान' संपन्न

## रायगडाच्या मेघडंबरीतील हुबेहूब शिवमूर्तीचे अनावरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : "गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण" या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्यास मिळणाऱ्या नियतव्ययाच्या प्रमाणात कोणताही बदल न करता महसूली क्षेत्रिय कार्यालयाकडून जनतेस सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान" मंडळ स्तरावर आयोजित करण्याकरिता महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- 2025/प्र. क्र.34/3-8 दिनांक 25 मार्च 2025 अन्वये महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी निकालात काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्यामध्ये मंडळ स्तरावर समाधान शिबिरांचे आयोजन करण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत.

त्यानुषंगाने जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व ठाणे उपविभागीय अधिकारी उर्मिला पाटील यांच्या विद्यमाने मिरा भाईंदर अपर तहसिलदार कार्यालयांतर्गत दि.05 जून 2025 रोजी सेंट जोसेफ मराठी शाळा, उत्तन, भाईंदर (प.) येथे "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान" आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवास प्रमाणपत्र, वय राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, रेशनकार्ड, नविन आधारकार्ड व दुरुस्ती इ. सेवांबाबत नागरिक/अर्जदार/विद्यार्थी यांच्याकडून प्राप्त अर्जांनुसार शिबिरामधेच वरील प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

या शिबिरासाठी ठाणे उपविभागीय अधिकारी उर्मिला पाटील, मिरा भाईंदर अपर तहसिलदार निलेश गोंड, नायब तहसिलदार स्मिता गुरव, भाईंदर मंडळ अधिकारी धनराज चव्हाण यांच्यासह सर्व तलाठी, महसूल कर्मचारी, शिधापत्रिका विभागातील कर्मचारी, सेतू चालक, आपले सरकार सेवा केंद्र चालक उपस्थित होते. या शिबिरांतर्गत अर्जदार/विद्यार्थी यांना वरील सेवा तात्काळ मिळाल्यामुळे समाधान व्यक्त करण्यात आले.

# डोंबिवलीत शिवस्मारक नूतनीकरणाचा सोहळा

## रायगडाच्या मेघडंबरीतील हुबेहूब शिवमूर्तीचे अनावरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : अनेक वर्षांपासून डोंबिवली शहरात मानपाडा रोड येथील शिवसेना मध्यवर्ती शाखेच्या बाजूला छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती स्थापित करण्यात आली होती. छत्रपती शिवराज्याभिषेकाचे औचित्य साधून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नाने छत्रपती शिवाजी महाराजांची मेघडंबरीसह सिंहासनारूढ प्रतिमा शिवस्मारकात विराजमान करण्यात आली आहे. रायगडाच्या मेघडंबरीतील हुबेहूब शिवमूर्तीचे अनावरण पार पडला.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या पूर्वसंध्येला डोंबिवलीत शिवगर्जना, ढोल-ताशा, लेझीम, घोडेनृत्याच्या पार्श्वभूमीवर हा सोहळा पार पडला. मानपाडा रोडवरील शिवसेना शाखेसमोरील पुतळ्याचे नूतनीकरण करण्यात आले. दरम्यान हुबेहूब रायगडाच्या मेघडबंरीतील राजबिंडे शिवरायांचे दर्शन घेण्याकरता येथे नागरिकांनी गर्दी केली होती. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून हे साकार झाले. या लोकार्पणासाठी मोठ्या प्रमाणात शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, भाजपा प्रदेश कार्याध्यक्ष तथा आमदार रविंद्र चव्हाण, पालिका आयुक्त अभिनव गोयल, शिवसेना आमदार राजेश मोरे, कल्याण जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे, उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, स्थायी समितीचे माजी सभापती रमेश म्हात्रे, माजी आमदार आप्पा शिंदे, सुरेश जोशी, माजी उपमहापौर राहुल दामले, भाजपा कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, भाजपा अनुसूचित जाती मोर्चा सरचिटणीस शशिकांत कांबळे, शिवसेना महिला आघाडी प्रमुख लता पाटील, कल्याण जिल्हा लोकसभा अध्यक्ष जितेन पाटील, तालुकाप्रमुख महेश पाटील, गुलाब वझे, युवा सेना जिल्हा सचिव राहुल म्हात्रे, सागर जेधे, संतोष चव्हाण, माजी नगरसेवक संजय पावशे, दत्ता वझे, जयंता पाटील, शीतल लोके, कविता गांवड, शिल्पा मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.




# दुर्गाडी किल्ला प्रकरण : सार्वजनिक बांधकाम विभागाची टोलाटोली

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याणातील इतिहास कालीन दुर्गाडी किल्याची संरक्षक भिंत बुधवारी पहाटे झालेल्या पावसात कोसळल्याची घटना घडली. या पुरातन ऐतिहासिक ठेव्याची जबाबदारी आपल्या अंगावरून झटकण्यात सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पुरातत्व विभाग यांची जुपंली असल्याचे यानिमित्ताने समोर आले असून शासन अंग असलेल्या दोन्ही विभागाची टोलावा टोली पाहता, जबाबदार कोण असा सवाल यानिमित्ताने उभा ठाकला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या आरमारांची मुहूर्तमेढ कल्याणमधील दुर्गाडी किल्ला येथे रोवली. त्यामुळे ऐतिहासिक महत्त्व असलेले किल्ले दुर्गाडी हे लाखो शिवभक्तांचे श्रद्धा स्थान असून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करोडो रू. खर्च करून किल्याची डागडुजी तसेच बुरूजाचे काम, कमानी चे काम सुरू आहे. अशातच किल्ल्याच्या समोरील बाजूस असलेली संरक्षक भिंत अवघ्या अर्ध्या तासाच्या पावसात बुधवारी पहाटे कोसळली. कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी अधिकार्यांना ठेकेदारा हलगर्जीपणा बाबत खडे बोल सुनावित धारेवर धरले.

तर गुरुवारी खासदार सुरेश म्हात्रे यांनी दुर्गाडी किल्याच्या भिंतच्या ढासळलेल्या भागाची पाहणी करीत ठेकेदारावर कारवाईची मागणी केली. काळ्या यादीत टाकावे असेही म्हणाले. या घटनेत पुरातन ऐतिहासिक ठेव्याच्या जबाबदारी आपल्या अंगावरून झटकण्यात सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पुरातत्व विभाग यांची जुपंली असल्याचे दिसून आले असतानाच, सार्वजनिक बांधकाम विभागाने उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी उपविभाग कल्याण यांना पत्र दिले आहे. या पत्रात कल्याण येथील दुर्गाडी किल्ल्याच्या भोवती बांधण्यात आलेली संरक्षण भिंत कोसळल्या बाबत संरक्षण भिंतीचे काम हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन करण्यात आलेले नाही. सदरचे काम हे पुरातत्व विभागा कडुन करण्यात आलेलं आहे. त्यामुळे या कोसळलेल्या संरक्षण भितीबाबत या विभागाकडुन कोणतीही कार्यवाही होणे क्रमप्राप्त होत नाही. हे आपल्या माहितीसाठी व पुढील उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर. अशा आशायाचे पत्र उपविभागीय अधिकारी सा. बां, उपविभाग क्रं 1कल्याण यांनी दिले असल्याने पुरातत्व विभागाकडे किल्ले दुर्गाडी भिंत कोसळल्याच्या घटना प्रकरण वळले असल्याचे दिसून येत आहे.

### बकरी ईदसाठी

# भिवंडी महापालिका प्रशासन सुसज्ज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहर परिसरात मुस्लिम बांधवांचा पवित्र बकरी ईद हा सण उद्या ( 7 जून) रोजी संपन्न होणार आहे.त्यामुळे पोलीस व महानगरपालिका प्रशासनाचे अधिकारी सुसज्ज झाले आहेत. आज सकाळी पालिका आयुक्त व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी ठीक ठिकाणी जाऊन कुर्बानी स्थळांची पाहणी केली.जनावरांची कुर्बानी झाल्यानंतर तातडीने त्या ठिकाणी असलेले अपशिष्ट उचलून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्याचे निर्देश आयुक्तांनी कर्मचाऱ्यांना दिले.तसेच त्या जागेवर पाणी मारून स्वच्छता व जंतुनाशक औषध फवारणी करण्याचे आदेश पालिका आयुक्त अनमोल सागर यांनी आरोग्य व स्वच्छता विभाग अधिकाऱ्यांना दिले,दरम्यान पोलीस उपाआयुक्त शशिकांत बोराटे यांनी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या आदेशानुसार सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या सोबत विशेष बैठक घेऊन चर्चा करून शहरातील विविध ठिकाणी विशेष पोलीस गस्त व बंदोबस्त तैणात केला आहे.




मुस्लिम बांधवांचा पवित्र असा बकरी ईद हा सण 7 ते 9 जून असा तीन दिवस संपन्न होणार आहे. त्यामुळे भिवंडी पोलीस उपाआयुक्त शशिकांत बोराटे,एसीपी सचिन सांगळे यांनी व महापालिका आयुक्त अनमोल सागर व उपायुक्त कर्मचाऱ्यां सोबत नुकतीच विशेष बैठक घेऊन शहरातील कुर्बानी ठिकाणां संदर्भात चर्चा करून पाहणी केली.महापालिका प्रशासनाचेवतीने शहरातील विविध ठिकाणी सुमारे 56 कुर्बानी जागा असुन त्या ठिकाणी 56 पशुवैद्यकीय अधिकारी तैनात करण्यात आले आहे. त्यांच्याकडून जनावरांची तपासणी करूनच कुर्बानी होणार असल्याचे सांगण्यात आले.त्यानंतर अपशिष्टे उचलून गाडीतून वहन करून त्यांची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येणार आहे.कुर्बानी जागा स्वच्छ करून जंतुनाशक औषध फवारणी करण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य व स्वच्छता विभाग प्रमुख जे.एम. सोनावणे यांनी दिली.
महापालिका प्रशासनाचेवतीने सुमारे 800 हुन अधिक सफाई कर्मचारी व विविध ठिकाणी अधिकारी उपस्थित राहणार असल्याची माहिती आरोग्य व स्वच्छता अधिकारी जयंवत सोनावणे यांनी दिली.

**बकरी ईद हा धार्मिक सण सुरळीतपणे पार पडावा यासाठी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी सिद्धी सभागृहात जिल्ह्यातील शांतता समीती सदस्य व मुस्लिम समाजातील मौलाना,प्रतिष्ठित नागरिकांची विशेष बैठक घेऊन कायदा सुव्यस्था व शांततेचे वातावरणासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करून मार्गदर्शन केले.यावेळी ठाणे सहपोलीस आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण,अतिरिक्त पोलीस आयुक्त विनायक देशमुख यांच्या सह पोलीस अधिकारी उपस्थित होते. ईद निमित्ताने पोलिसांनी सर्वत्र विशेष बंदोबस्त ठेवला असुन सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले असुन पोलीस गस्त असणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

# कुडयाच्या फुलांना आलाय बहर !

## गुणकारी औषधी असल्याने मोठी मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(बाळासाहेब भालेराव) : जंगलात नैसर्गिकरित्या वाढणारी सुप्रसिद्ध रानभाजी म्हणून ग्रामीण भागात कुडयाच्या फुलांना खूप मोठी मागणी असून वर्षातून एकदा पोट दुखी होऊ नये म्हणून एकदा तरी ही भाजी खाण्याचा प्रघात ग्रामीण भागात आहे.

कुडा हा १०ते१५ फुट उंच वाढणारी वनस्पती असून कुड्याची फुले व शेंगा त्याची भाजी करतात.

कुडा औषधी वनस्पती अनेक आजारांवर गुणकारी असून मूळव्याध, रक्तस्राव, अतिसार, आंभांस अशा अनेक विकरात उपयुक्त आहे. पांढऱ्या रंगाच्या फुलांचे गुच्छ हीच भाजी अत्यंत साध्या पद्धतीने शेतकरी भगिनी करतात, पांढरा कुडा व काळा कुडा तसेच तांबडा कुडा असे तीन प्रकार आहेत.अशी माहिती शेतकरी हा.भ.प. चंद्रकांत धुमाळ (महाराज) यांनी दिली आहे.



**कुडयाच्या फुलांचे पांढरा,काळा,तांबडा तीन प्रकार आहेत.
कुडा हे अत्यंत गुणकारी औषधी वनस्पती आहे.
पोट दुखी होऊ नये म्हणून एकदा तरी ग्रामीण भागात कुडयाची भाजी खाण्याचा प्रघात आहे.
- चंद्रकांत धुमाळ (महाराज),शेतकरी/ कोरावळे**

कुडयाची फुले खूप नाजूक व सुंदर असतात. अत्यंत झटपट त्याची भाजी होते. त्याची भाजी थोडी कडू लागते. प्रसिद्ध कुरजारिस्ट हे औषध बनवले जाते. त्यामुळे कुड्याची फुले व भाजी यांना ग्रामीण भागात विशेष महत्त्व दिले जात आहे.

# मुरबाड नगरपंचायत तर्फे वृक्षारोपण !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : ०५ जून २०२५ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त संपूर्ण राज्यात वृक्षारोपण अभियानची सुरवात करण्यात आली. त्यानुषंगाने मुरबाड नगरपंचायत हद्दीमध्ये सर्व प्रभागात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण




करताना सर्व नगरसेवक, मुरबाड नगरपंचायत कर्मचारी, नागरिक उपस्थित राहून सर्वांनी या उपक्रमात सहभाग दर्शविला. वृक्षारोपण ही काळाची गरज असून प्रत्येक नागरिकांनी वृक्षारोपण करून आपल्या वसुंधरेचे संरक्षण करावे असे आव्हान मुरबाड नगरपंचायतद्वारे करण्यात आले.

# एशियन एल्बो बॉक्सिंग स्पर्धेसाठी रायगडच्या खेळाडूंची निवड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : एशियन एल्बो बॉक्सिंग स्पोर्ट फेडरेशन आणि एल्बो बॉक्सिंग इंडिया असोशिएशन ह्यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ६ ते ८ जुन २०२५ रोजी पद्म एंनडोअर स्टेडियम गोवा माप्सा येथे पहीली दक्षिण एशियन एल्बो बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन डॉ.मंदार पनवेलकर चेअरमन एल्बो बॉक्सिंग फेडरेशन सुरेश कोळी अध्यक्ष एल्बो बॉक्सिंग असोशिएशन इंडिया ह्यांच्या अध्यक्षते खाली घेण्यात येणार आहेत. ह्या स्पर्धेसाठी पेण रायगड येथे रायगड भुषण रविंद्र म्हात्रे ह्यांच्या कडे पेण तालुका क्रिडा संकुल येथे एल्बो बॉक्सिंगचे प्रशिक्षण घेत आसलेल्या विद्यार्थेन मधील दर्श कैलास धावडे, रुद्रेश प्रथमेश पाटील, पार्थ हर्षवर्धन शहासने, अनुज रणपिसे,मोहीत परशुराम कोठेकर, निशिगंध संतोष पाटील, आर्यन निलेश म्हात्रे, स्वरांगी नचिकेत घैसास, रितुल रविंद्र म्हात्रे ह्याची निवड करण्यात आली आहे. ह्या स्पर्धात निवड झालेल्या सर्व खेळाडूंना युनायटेड शोतोकान कराटे असोशिएशन, रायगड जिल्हा एल्बो बॉक्सिंग असोशिएशन,महाराष्ट्र एल्बो बॉक्सिंग असोशिएशन ह्यांच्या तर्फे शुभेच्छा देण्यात आल्या.

### डोहोळे या ग्रामपंचायत तर्फे

# दिव्यांगांना निधी वाटप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : येथील डोहोळे या ग्रामपंचायत वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्ष लागवड व प्लास्टिक बंदी बाबत जनजागृती करुन दिव्यांग लाभार्थ्यांना निधी वाटप करण्यात आले.

5 जून या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे या ग्रामपंचायत विभाग वतीने पर्यावरण वाचविण्याचा दृष्टीने पाऊल उचलून गावात वृक्षलागवड करुन येथे प्लास्टिक बंदी बाबत जनजागृती करण्यात आली. तसेच ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या डोहोळे, कोशिंबी, आन्हे, सोर व कळंबोली या गावातील दिव्यांग लाभार्थ्यांना सन 2025-026 या मधील ग्रामपंचायत 5 टक्के दिव्यांग निधी वाटप कार्यक्रम राबविण्यात आला. तर ग्रामपंचायत हद्दीतील जवळपास 60 असलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांपैकी 33 लाभार्थ्यांना निधी वाटप करण्यात आले असून सदरचा निधी वाटप उपक्रम सुरू राहणार असून उर्वरित लाभार्थ्यांनी आपल्या वेळेत कार्यालयात निधीसाठी उपस्थित रहावे असे आवाहन ग्रामपंचायत समिती व विभागानी केले आहे.

या कार्यक्रमावेळी सरपंच दिनेश दत्तात्रय ठाकरे, माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य सचिन घोडविंदे, सदस्य शुद्धोधन जाधव, ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे आदी ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ व दिव्यांग बांधव उपस्थित होते.







'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024